महाराष्ट्र शासन
आयुक्त
वैद्यकीय शिक्षण व आयुष, महाराष्ट्र राज्य
४था मजला, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई -४०० ००१
दुरध्वनी - (०२२) - २२६२०३६३-६५ संकेतस्थळ - med-edu.in

क्रं.संवैशिवसं/स्पर्धा परीक्षा-२३/कागदपत्र पडताळणी/२०२३ दिनांक:-०४ मे, २०२४

# सूचना

COT स्पर्धा परिक्षा -२०२३ च्या उमेदवारांना कळविण्यात येते की, खालील नमूद बाबींच्या अनुषंगाने यादी प्रसिध्द करण्यात येत आहे.

१) आर्थिक दुर्बळ घटक या प्रवर्गातील उमेदवारांनी प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज भरण्याची अंतिम तारीख २५.०५.२०२३ ही तारीख ग्राहय न धरता सन २०२३-२४ चे EWS प्रमाणपत्र ग्राहय धरण्यासाठी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मुळ अर्ज क्रं. ६४/२०२४ नुसार अर्ज दाखल केला होता. सदर अर्जाचा निकाल दिनांक १६/०४/२०२४ रोजी लागला असून मा. न्यायाधिकरणाने सन २०२३-२४ चे EWS प्रमाणपत्र ग्राहय धरण्याचे आदेश दिले आहेत.त्यानुसार ज्या उमेदवारांनी सन २०२३-२४ चे EWS प्रमाणपत्र सादर केले आहे अशा उमेदवारांना गुणवत्ता यादीत पात्र करण्यात आलेले आहे.

२) सामान्य प्रशासन विभाग १९ डिसेंबर, २०१८ मध्ये शासन सेवेत सरळसेवा भरतीसाठी समांतर आरक्षण कार्यान्वित करण्याबाबत कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रकातील कार्यपध्दतीनुसार अंशकालीन प्रवर्गातील पदे त्या त्या सामाजिक प्रवर्गातील उमेदवारांना वाटप करण्यात येत आहे.

३) समांतर आरक्षणाची पदे भरल्यानंतर शिल्लक राहीलेली समांतर आरक्षणाची पदे आणि परिचर्या पदाचे आदेश निर्गमित केल्यानंतर जे उमेदवार रुजू झाले नाहीत अशा उमेदवारांच्या जागेवर गुणवत्ता यादीतील पुढील उमेदवारांना नियुक्ती देण्यात येत आहे.

आयुक्त
वैद्यकीय शिक्षण व आयुष
मुंबई